**International Journal of Advance and Applied Research**
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/**
***Volume-13, Issue-3 | January – February 2026***

**Original Article**

# सोलापूर जिल्ह्यातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणातील स्वयंसहाय्यता गटाची भूमिका

**अश्विनी दगडू वाडेकर[1], आरती महादेव राऊत[2]**

*[1,2]एम.ए. भाग-2*

*रयत शिक्षण संस्थेचे, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर*

**Manuscript ID:**
IJAAR-B130397
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 3**
**January – February 2026**
**Pp. 624 - 628**

**Submitted:** 25 Jan.2026
**Revised:** 12 Feb. 2026
**Accepted:** 15 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***Corresponding Author:***
*अश्विनी दगडू वाडेकर*

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.20322826

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.20322826

Creative Commons

OPEN ACCESS

**प्रस्तावना:**

महिलांचे अर्थ सक्षमीकरण हा आधुनिक समाजतील आजच्या काळातील महत्त्वाचा विषय आहे सरकारने महिलांच्या आर्थिक साक्षमीकरणाकडे विशेष असे प्राधान्य दिले आहे. आर्थिक दृष्ट्या सक्षम महिला केवळ स्वतःच्या जीवनात नव्हे तर कुटुंब आणि समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरत तसेच त्यांची मोलाचे योगदान आहे परंपरेने चालत आलेल्या रूढी परंपरा यानुसार पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये महिलांना आर्थिक निर्यात महत्व दिले जात नाही. त्यांना चूल आणि मुल या संशेतच अडकवून ठेवले जाते त्यामुळे परंपरेने ग्रामीण भागातील महिला आर्थिक निर्णय मध्ये मागे राहतात. मात्र स्वयंसहाय्यता गट या माध्यमातून महिलांना बचत कर्ज व्यवसाय आणि सामाजिक सहभागांमध्ये मार्गदर्शन मिळते.

ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान उंचावण्यात तसेच आर्थिक विकासात स्वयंसहायता गटाचे मोलाचे योगदान ठरते. सोलापूर जिल्हा हा ग्रामीण शहरी भागाचा सीमांत प्रदेश असून येथे महिला आणि सामाजिक व आर्थिक अडचणींना सामना करतात. स्वयंसहायता गट या महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी विविध कौशल्य विकसित करण्यासाठी तसेच घर आणि समाजातील निर्णय प्रक्रियेत भाग घेण्यासाठी एक प्रभावी ठरतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*अश्विनी दगडू वाडेकर, आरती महादेव राऊत. (2026). सोलापूर जिल्ह्यातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणातील स्वयंसहाय्यता गटाची भूमिका. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 624 - 628.* https://doi.org/10.5281/zenodo.20322826

**ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

आशिया खंडातील मागास राष्ट्र म्हणून बंगलादेशची ओळख असली तरी तेथील स्वयंसहायता बचत गटाचे गटा मुळे 1970 च्या दशकात शेवटी बंगलादेशातील चित्तगाव विद्यापीठातील अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक व बांगलादेश ग्रामीण बँकेचे प्रेरित डॉक्टर मोहम्मद युसुस यांच्या प्रेरणेतून जगभर विशेषतः विकसनशील देशात बचत गटाचे संकल्पना फेकवताना दिसते. भारतातील दृष्टिकोनातून महिला

सबलीकरणाची संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरली भारतामध्ये महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची सुरुवात दोन 1992 सण राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक नाबार्ड ची योजना एस एच जी बैंक लिकेज प्रोग्रामच्या माध्यमातून झाली.

नाबार्ड या संस्थेच्या पुढाकाराने 1992 सुरू झालेल्या या बँकेने सेल्फ हेल्प ग्रुप बँक लिंकिंग प्रोग्रॅम राबवून देशभर बचत गटांना आर्थिक सहाय्य देण्यास सुरुवात केली. त्यामुळे लाखो महिलांना बँकिंग प्रणालीशी जोडल्या गेल्या आणि ग्रामीण अर्थ व्यवस्थेला एक नवीन दिशा मिळाली. स्वयंसहाय्यता बचत गट म्हणजे समान आर्थिक परिस्थितीतील लोकांनी एकत्र येऊन शिष्यता महिलांनी एकत्र येऊन नियमित ठराविक रक्कम बचत करणे, एकमेकांना कर्ज देणे आणि सामूहिक सहकार्याने आर्थिक विकास साधने हा एक सामाजिक आणि आर्थिक उपक्रम आहे. हे गट विशेषता ग्रामीण भागातील आर्थिक परिवर्तन नाचे साधन बनले आहे. या प्रोजेक्टमध्ये आपण सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसहायता बचत गटाच्या महिलांच्या आर्थिक साक्षमीकरणातील भूमिकांचा अभ्यास करणार आहोत. त्यात एसएससी मधील बचत कर्ज विविध योजना सुविधा व्यवसाय विकास सामाजिक सशक्त करण आणि महिलांच्या जीवनातील बदल यांचा समावेश आहे. या अभ्यासातून एसएससी महिलांना आत्मनिर्भर बनवण्यात कशी मदत झाली हे स्पष्ट होईल उद्दिष्ट असणार आहे.

**उद्दिष्टे:**

1. स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्त्व अभ्यासणे,
2. बचत गटाची कार्यपद्धती अभ्यासणे.
3. बचत गटांना मिळणाऱ्या सरकारी योजना व लाभांचा अभ्यास
4. महिलांच्या आर्थिक सामाजिक व आर्थिक स्थितीत झालेला बदल.
5. ग्रामीण विकासातील योगदान अभ्यासणे.
6. बचत गटांच्या उभारणीमुळे महिलांमधील झालेल्या सक्षमीकरणाचा अभ्यास.

**पार्श्वभूमी:**

भारतात महिलांचे स्थान पूर्वीपासून चालत आलेल्या रूढी परंपरेने कुटुंबात पुरतेच कुटुंबकेंद्रित राहिले असून आर्थिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग फारसा नव्हता ग्रामीण भागातील शिक्षणाचा अभाव असल्याकारणाने तसेच रोजगाराच्या संधीची कमतरता. आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक बंधने यामुळे महिलांच्या आर्थिक साक्षमीकरण अडथळयात सापडले आहेत. या परिस्थितीत महिलांना स्वतःचे उत्पन्नाचे साधन निर्माण करण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी प्रभावी माध्यमांची आवश्यकता होती. या पार्श्वभूमीवर स्वयंसहाय्यत. बचत गट ही संकल्पना पुढे आली स्वयंसहायता गट महिलांना एकत्र आणून नियमित बचत करण्याची सवय लावतात महिलांनी केलेल्या बचतीतून एकमेकांच्या सहकार्याने गरजू साहाय्याने कर्ज उपलब्ध करून देतात आणि स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून विविध व्यवसाय कलाविषयक प्रशिक्षण देऊन योग्य ते मार्गदर्शन करून लघुउद्योग व इतर स्वयमरोजगार करण्यासाठी प्रोत्साहन देतात. स्वयंरोजगाराच्या विविध संधी निर्माण करतात; या गटांमुळे महिलांना बँकिंग व्यवसायाशी संपर्क साधता येतो बैंकिंग ज्ञान मिळते तसेच विविध शासकीय योजना आणि आर्थिक सहाय्य मिळणे सोपे होते.

सोलापूर जिल्हा हा प्रामुख्याने ग्रामीण व अर्थ शहरी भागांनी बनलेला आहे. सोलापूर जिल्हा हा प्रामुख्याने कृषी

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

प्रधान असून येथील सुमारे 65% पेक्षा जास्त लोकसंख्या शेती आणि संबंधित व्यवसायावर अवलंबून आहे. ज्वारी बाजरी तुरी हरभरा सूर्यफूल सोयाबीन आणि उसकी प्रमुख पिके आहेत. उजनी धरणामुळे बागायती क्षेत्र वाढले असून डाळिंब उत्पन्नातही जिल्ह्यात मोठा हिस्सा आहे. ते शेती मजुरी आणि उद्योगांवर मोठ्या प्रमाणात अवलंबित्व आहे. या जिल्ह्यातील अनेक महिला आर्थिक दृष्ट्या दुर्बल असून पारंपारिक व रोजगारांच्या संधी मर्यादित आहेत. अशा परिस्थितीत स्वयंसहाय्यता गटांनी महिलांना आर्थिक आधार कौशल्य विकास आणि सामाजिक आत्मविश्वास मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वयमता येता गटाच्या माध्यमातून महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले असून त्यांचे साक्षमीकरण शक्य झाले. सोलापूर जिल्ह्यातील महिलांच्या आर्थिक विकासातील बचत गटाची भूमिका हा विषय निवडण्यामागील हेतू म्हणजे सोलापूर जिल्हा हा कृषिप्रधान जिल्हा आहे.

शेती हा प्रमुख उदरनिर्वाहाचे साधन आहे शेती आणि त्यासंबंधीची सर्व कामे स्त्रिया करत असतात स्त्रियांच्या अंत काटकसरपणा काठ कसरपणा जिद्द चिकाटी व प्रबळ आत्मविश्वास असतो. स्त्रिया या संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी तसेच शेतांनी त्या संबंधित असणाऱ्या शेतीपूरक व्यवसायाची व्यवस्थापन करण्याची भूमिका बजावत असतात. अशा स्त्रियांना आर्थिक साक्षरणी करण्याच्या माध्यमातून संधी मिळाल्या तर त्यांचा सर्वांगीण विकास होईल तसेच विविध उद्योग व स्वयंरोजगार वाढ होईल ती स्वतः स्वावलंबी बनेल या सर्व प्रक्रियेत बचत गटाचा मोलाचा वाटा आहे. आज सोलापूर जिल्ह्यात शहरी तसेच जास्त प्रमाणात ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत महिला बचत गट म्हणजे स्वयंसहायता गटाचे महत्त्वाच्या सहभाग आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून मिळणाऱ्या प्रशिक्षणातून छोटे-मोठे उद्योग व्यवसाय सुरू करून स्वतः आर्थिकदृष्ट्या साक्षम बनत आहेत.

**सोलापूर जिल्ह्याचा आढावा:**


सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्राच्या आग्नेय भागात स्थित आहे भीमसेना नद्यांच्या खोऱ्यातील एक प्रमुख ऐतिहासिक व सांस्कृतिक जिल्हा आणि 14.895 चौकी मीटर क्षेत्रफळ असलेला हा जिल्हा ज्वारीचे कोठार म्हणून ओळखला जातो. तसेच हात माग पावरलूम आणि सुप्रसिद्ध सोलापुरी चादरीनसाठी हा जिल्हा प्रसिद्ध आहे. सोलापूर जिल्ह्यात एकूण 11 तालुके आहेत उत्तर सोलापूर दक्षिण सोलापूर करमाळा माढा अक्कलकोट बार्शी मंगळवेढा पंढरपूर सांगोला माळशिरस मोहोळ इत्यादी 2011 च्या माहितीनुसार सोलापूर जिल्ह्यात एकूण 33.46 स्वयंसहाय्यता बचत गट होते यामध्ये Below poverty line आणि Abave poverty line यांचा समावेश आहे.

सोलापूर जिल्ह्यातील 8695 बचत गटांना 418 कोटींचे कर्ज वाटप केले आहे. जिल्ह्यातील बचत गटांनासातत्याने कर्ज वाटप अधिक करण्याचा पायंडा पडला आहे. सोलापूर जिल्ह्यात उमेद बैंक व बचत गटांच्या एकत्रित कामगिरीने हा आकडा वाढत राहिला आहे. तालुका निहाय बचत गटांना आजपर्यंत झालेला कर्ज वाटप बचत गट. संख्या मार्च 2025 अखेर माहितीनुसार.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

| तालुका बचत गटाची संख्या | कर्जाची रक्कम |
|---|---|
| १. उत्तर सोलापूर ८३७ | ३४ कोटी ७६ लाख |
| २. मंगळवेढा ५९५ | ३४ कोटी २१ लाख |
| ३. माढा १११६ | ५३ कोटी ९० लाख |
| ४. बार्शी ८०० | ३८ कोटी ८१ लाख |
| ५. माळशिरस १५२३ | ८० कोटी १५ लाख |
| ६. पंढरपूर ९३८ | ४९ कोटी ३४ लाख |
| ७. मोहोळ ७२७ | ३५ कोटी ०४ लाख |
| ८. द. सोलापूर ५८४ | २५ कोटी ९७ लाख |
| ९. करमाळा ३५३ | १६ कोटी ८० लाख |
| १०. अक्कलकोट ४३४ | १५ कोटी ९८ लाख |
| ११. सांगोला ७८८ | ४२ कोटी ६२ लाख |

**एकूण सोलापूर जिल्हा ८६९५ कर्ज ४१८ कोटी ९५ लाख**




**कर्ज आलेख**

सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये बचत गटांना वितरित करण्यात आलेल्या कर्ज रकमेचे वितरण समान स्वरूपाचे नाही. काही तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध झालेले दिसून येते. तर काही तालुके तुलनेने मागे राहिलेले आहेत. माळशिरस, माढा आणि सांगोला हे तालुके आर्थिकदृष्ट्या अधिक सक्रिय असल्याचे दिसून येते.

या तालुक्यांमध्ये बचत गटांची संख्या अधिक असून, बैंकिंग सुविधा व कर्जपुरवठा प्रभावीपणे राबवला जात आहे. त्याउलट करमाळा, अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या तालुक्यांमध्ये कर्ज वितरणाचे प्रमाण कमी आहे. यामागे बचत गटांची मर्यादित संख्या, आर्थिक उपक्रमांची कमतरता तसेच प्रशिक्षण व मार्गदर्शनाचा अभाव ही कारणे असू शकतात. त्यामुळे या तालुक्यांमध्ये महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अपेक्षित पातळीवर झालेले दिसून येत नाही. जर मागास तालुक्यांमध्ये बचत गटांना योग्य प्रशिक्षण, आर्थिक साक्षरता व बँकांशी सुसंवाद साधून दिला, तर त्या तालुक्यांमध्येही आर्थिक प्रगती साधता येईल. त्यामुळे जिल्ह्यातील समतोलविकासासाठी दुर्लक्षित तालुक्यांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. वरील चार्ट मध्ये सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील स्वयंसहाय्यता गटांची संख्या त्यांना वितरित करण्यात आलेल्या कर्जाचे रक्कम दर्शविण्यात आली आहे. या चार्टवरून असे दिसून येते की सोलापूर जिल्ह्यात स्वयंसहाय्यता गटाचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सर्वात तालुक्यांचा विचार करताना माळशिरस तालुक्यांमध्ये स्वयंसहाय्यता बचत गटाचे जाळे अधिक विस्तारित झालेले आहेत. तसेच कर्जवाटप ही मोठ्या प्रमाणात दिसून येते. जिल्ह्यातील बचत गटांना कर्ज देण्याचे बँकेचे वर्षभराचे एकूण उद्दिष्ट 320 कोटी असताना मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमाचा कायदा होऊन हा आकडा 418 कोटींवर पोहोचला वर्षभरात एकट्या मावशी रस्ता तालुक्यातील बचत गटांना 80 कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील उमीद बँक व बचत गटांच्या एकत्रित कामगिरीने हा आकडा वाढता राहिला आहे.

**निष्कर्ष:**

वरील संशोधनातून असे दिसून आले की ग्रामीण भागातील आर्थिक विकासाचे स्वयंसहाय्यता गटाची मोलाचे योगदान आहे. स्त्रिया आर्थिक दृष्ट्या साक्षम बनल्या

स्त्रियांमधील असणाऱ्या त्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव देणता आला स्त्रियांमध्ये बचत गटाची सवय निर्माण झाली. समाजात स्त्रियांना पुरुषांबरोबर दर्जा दिला जाऊ लागला स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून मिळणाऱ्या कर्जातून त्या लघु उद्योग कुटीर उद्योग व्यवसाय सुरू करून आर्थिकदृष्ट्या साक्षम बनल्या महिलांनी नवनवीन कौशल्य शिकून रोजगाराच्या संधी निर्माण केली.

**संदर्भसूची:**

1. स्वयंसेवी संस्था अहवाल.
2. अल्प बचत नियोजन डॉ एम यु मुलानी शारदाबाई पवार महिला महाविद्यालय शारदानगर तालुका बारामती पुणे.
3. काटोले रवींद्र महिला बचत गट गोडवा कृषी प्रकाशन पुणे.
4. https://solapursamachar.com.2025
5. https://agrowonesakal.com
6. https://shodhgangotriinfibeet.ac.in.८४४३